# जागतिकीकरण आणि बदलती मराठी कविता

**प्रा. डॉ. गणेश लहाने**
मराठी विभाग प्रमुख
तथा उप प्राचार्य,
दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना :**

माणूस आणि समाज यांचे अतूट नाते संबंध असून माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो ज्या समाजात राहत असतो त्या समाजातील चांगले आणि वाईट होत असलेले बदल तो अनुभवत असतो. या बदलांचे परिणाम समाजात राहणाऱ्या साहित्यिकांच्या मनावर होत असतात आणि साहित्यिक या बदलांचे होणारे समाजावरील परिणाम आपल्या साहित्यकृतीच्या माध्यमातून चित्रित करत असतात. याला भारत देशही अपवाद नाही. इ. स. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि तिथून पुढे भारतात शिक्षणाची गंगा हळूहळू वाहू लागली. वाडी, वस्ती, तांडे इथे नवीन शाळांची निर्मिती झाली. या नवीन शाळेत शिकलेली पिढी समाजातील चांगले काय आणि वाईट काय याचा विचार करू लागली म्हणजेच शिक्षणाने एक नवीन तरुण पिढी आणि विशेष म्हणजे डोळस नजरेने समाजाकडे पाहणारी पिढी जन्माला आली. पारंपरिक समाज व्यवस्थेत आजपर्यंत भोगल्या गेलेल्या समाज जीवनाचे चित्रण साहित्यात कुठेही आलेले नाही. याची जाणीव या नवीन पिढीला झाली आणि त्यातूनच साठोत्तरी मराठी साहित्याची निर्मिती झाली. पण हळूहळू जग बदलू लागले आणि या बदलत्या जगात नवीन उपकरणे येऊ लागली त्यातच संगणकाने क्रांती केली आणि याचे बरे वाईट परिणाम या समाज व्यवस्थेवर हळूहळू होऊ लागले. इ. स. १९९० नंतर तर केंद्र शासनाने आणि महाराष्ट्र शासनाने जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला. या धोरणाच्या स्वीकारामुळे समाज व्यवस्थेत आणि शहरी व्यवस्थेत खुप मोठ्या प्रमाणात बदल झाला. महानगराकडे जाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली आणि खेडी बकाल होत गेले. या वाढत्या महानगरीकरणामधूनच नवीन जीवन जाणिवा आणि नवीन समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. त्याचे चित्रण मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात येऊ लागले. याला काव्यप्रकारही अपवाद राहिला नाही. जागतिकीकरणानंतरची मराठी कविता खऱ्या अर्थाने बदलत गेली आणि भ्रमणध्वनीच्या आगमनामुळे 'विश्व एक खेड होत गेला.' या बदलत्या विश्वाविषयी आपले वास्तव मत मांडताना ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे असे म्हणतात की, "कॅरीबॅगांमधून प्रश्न वाहून नेता आहेत इथले लोक, दुधाच्या पिशव्याप्रमाणे, अश्रूंच्या पिशव्याही, फ्रिजमध्ये ठेवताहेत लोक, फ्लॅटमध्ये काळीज ठेवून."[१]

अशाप्रकारे जागतिकीकरणानंतर कॅरीबॅग ही प्रतिमा आपल्या कवितेमधून वापरून कवीने आधुनिक काळात कसे बदल झालेले आहेत याची मांडणी केलेली आहे. बारोमासकार सदानंद देशमुख जागतिकीकरणाविषयी असे म्हणतात की, "आज जागतिकीकरणातून फोफावणाऱ्या शहरी व्यवस्थेने खेडी पिळवटून टाकली आहेत. त्यामुळे खेड्यांची जी एक सकारात्मकता होती, ती संपुष्टात येऊ लागली. शेतमाल हेच मला माझ्या एकूण निरामय निर्मितीचे विधायक कारण वाटते. मात्र या शेतीलाही शहरी संस्कृतीतून येणाऱ्या अर्धवट आधुनिकीकरणांनी पोखरायला सुरुवात केली आहे. कृषी संस्कृती उद्ध्वस्त होते आहे. खेडी म्हणजे देशातल्या पेशी आहेत. शरीरातल्या पेशी नासल्या की, जसा कॅन्सर होतो, त्याप्रमाणे खेडी नसल्यामुळे सबंध व्यवस्थाच मरणपंथाला लागल्यासारखे वाटते आहे. यातूनच नव्या अर्थव्यवस्थेशी जुळवून न घेता आल्यामुळे जगणं असह्य झालेले शेतकरी मरणजवळ करू लागलेले आहेत. हे सगळंच झोप उडवणारे आणि भाकर कडू करणारे वास्तव आहे. फक्त ढसाढसा रडून आपण याला पुरेशी प्रतिक्रिया देऊ शकत नाही."[२] जागतिकीकरण ही शासनाच्या दृष्टीने जरी

चांगली बाजू असली तरी येथील समाज व्यवस्था मात्र जागतिकीकरणामुळे पूर्णतः ढासळलेली दिसून येते. अशा या जागतिकीकरणाच्या परिणामातून मराठी साहित्यात खूप मोठे बदल झालेले दिसून येतात. या बदलाचे चित्रण मराठी कथा, कविता आणि कादंबरी या साहित्य प्रकारामधून मोठ्या प्रमाणात चित्रित झालेले दिसून येते. यापैकी जागतिकीकरणाच्या रेट्यामधून मराठी कविता कशी बदलली याची माहिती प्रस्तुत शोधनिबंधातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जागतिकीकरणाच्या संपर्कातून जी मराठी कविता जन्माला आली त्यात वेगवेगळ्या ठिकाणी राहणाऱ्या कवींच्या कविता ह्या वेगवेगळ्या समस्या घेऊन जन्माला आलेल्या दिसतात. महानगरात राहणारे कवी महानगरात असणाऱ्या समस्यांचे चित्रण करतात तर जागतिकीकरणाच्या प्रभावातून खेडी कशी उद्ध्वस्त होत गेली याचे चित्रण ग्रामीण कवींनी केले. दलित साहित्य जागतिकीकरणातून कसे वेगवेगळ्या जाणिवा निर्माण करू लागले त्याचेही चित्रण दलित कवितेतून आले. स्त्रीवादी कवितेमधून अनेक कवयित्रींनी आधुनिकीकरणाच्या प्रभावातून स्त्रियांच्या आयुष्यामध्ये आलेले दुःख आपल्या कवितेमधून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्वांच्या परिणामातून जागतिकीकरणानंतर जी कविता जन्माला आली तिची माहिती खालील प्रमाणे सांगता येईल.

जागतिकीकरणाच्या प्रभावामधून महानगरीय जाणीव व्यक्त करणारी मराठी कविता जन्माला आली. तशी महानगरीय संवेदना व्यक्त करणारी मराठी कविता मराठी कवितेसाठी कांही नवीन नाही. या अगोदर कवी बा. सी. मर्ढेकर, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, कोल्हटकर आणि दि. पु. चित्रे या कवींनी महानगरीय जीवनाचे चित्रण करणारी कविता अगोदर लिहिलेली होती. पण १९९० नंतर आलेल्या जागतिकीकरणाच्या धोरणांमधून महानगरीय जीवनामध्येसुद्धा खूप मोठ्या प्रमाणात बदल झाले. या बदलाचे ज्वलंत चित्रण मराठी कवींनी केलेले दिसून येते. महानगरामधले जगणे, तेथील गतिमान जीवन, जीवनातील धावपळ, अस्थिरता याबरोबरच शहरी संस्कृतीमध्ये रुजत जाणारी मेट्रो, मॉल, लोकल, हॉटेल आणि बार, दादागिरी आणि झोपडपट्टीतील बकाल जीवन या आणि अशा अनेक समस्यांचे चित्रण महानगरात राहणाऱ्या अनेक कविंनी केलेले आहे. त्यात हेमंत दिवटे, श्रीधर तिळवे, संजीव खांडेकर, अनिल अवचार, सचिन केतकर, वर्जेश सोलंकी, मन्या जोशी, सलील वाघ या कवींनी महानगरी जीवनातील संवेदना आपल्या कवितेतून मांडलेली आहे.

कवी हेमंत दिवटे यांनी 'चौतीशीपर्यंतच्या कविता', 'थांबताच येत नाही' आणि 'या रूममध्ये आले की लाइफ सुरू होतं' या तीन प्रसिद्ध कवितासंग्रहाचे लेखन केले आहे. त्यांच्या कवितेमधून एक प्रकारचे वैफल्य दिसून येते विशेषतः भावनिक आणि संवेदनशील असलेल्या माणसाची होणारी महानगरांमधील कुचंबणा त्यांनी आपल्या कवितेमधून तीव्रपणे व्यक्त केलेली आहे. जागतिकीकरणा विषयी त्यांच्या मनात तीव्र संभ्रम असलेला दिसून येतो. हे आपल्या कवितेमधून मांडताना ते असे म्हणतात की, "तुझ्या शरीराला येणारा पॉण्डस ड्रीमफ्लॉवरचा सुगंध आणि तुझे ईमेल आठवतोय.

मरीन ड्राईव्हवरच्या कोलाहलातील आपला एकांत"[३] या कवितेमधून कवीने मुंबईसारख्या महानगराचे चित्रण करत असताना या महानगरात असणारी धावपळ तेथील जीवन आणि या धावपळीच्या जीवनातील प्रेमभावना व्यक्त करत असताना कवीने वरील भाव व्यक्त केलेले आहेत.

श्रीधर तिळवे यांनी जागतिकीकरणाच्या प्रभावामधून महानगरातील स्त्रीच्या जीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'स्त्री वाहिनी' नावाच्या कवितासंग्रहामधून त्यांनी स्त्रीच्या भूमिकेतूनही कविता लिहिलेली असून समकालीन स्त्रीच्या विविध रूपांचा आणि स्त्रीत्वाचा शोध त्याच्या कवितेमधून घेतलेला आहे. संजीव खांडेकर यांनी 'सर्च इंजिन' या कवितासंग्रहामधून संगणकाने माणसाच्या मनावर कसे अधिराज्य केले आहे आणि त्यातून मानवी जग संगणकाने कसे व्यापलेले आहे ही नवी संकल्पना त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेली आहे. त्यांच्या इतर संग्रहामधून माहिती तंत्रज्ञानातील शब्द, मीडिया, इंटरनेट, मॉल आणि मार्केट यासारख्या अनेक संकल्पना आलेल्या असून जागतिकीकरणाच्या परिणामातून नवीन संकल्पनांचा जन्म कसा झाला हे त्यांच्या कवितेमधून दिसून येते. संजीव खांडेकर यांच्या कवितेत नवजाणिवा आणि नवप्रतिमा आलेल्या दिसून येतात. टेस्टट्यूबबेबीसारखी नवीन संकल्पना त्यांच्या कवितेतून आलेली दिसून येते ते आपल्या कवितेमध्ये

असे म्हणतात की, "बरा गाळला घाम, झटापट अवयवांची केली, तरीही न उगवले फुल, सखे गं, बरी ही ट्युब"[४]

जागतिकीकरणामुळे माणसाच्या मनातील जीवन जाणिवांमध्ये कसा बदल होत गेला हे सुनील अवचार यांच्या कवितेमधून नेमकेपणाने आलेले दिसून येते. ते असे म्हणतात की, "या ग्लोबल वर्तमानात, भावना झाली आहे जाहिरात आणि मेंदूचे झाले आहे कम्प्युटर, तत्त्वज्ञान झाले आहे युज अँड थ्रो, संस्कृती झाली आहे रखेल."[५] या कवितेमधून कवीने नवीन जगात माणसाचा मेंदू आणि तत्त्वज्ञान यांची सांगड संस्कृतीशी घातलेली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनाने संस्कृतीचे कसे नुकसान झाले आहे याचेही वर्णन कवीने या कवितेत केलेले आहे.

सचिन केतकर यांनी 'जरासंधाच्या ब्लॉगवरचे काही अंश' आणि 'भिंती शिवायच्या खिडकीतून डोकावताना' हे दोन कवितासंग्रह लिहिलेले असून त्यांची कविता ही आत्मनिष्ठ व आत्मसंवादी असल्याचे जाणवते. तर वर्जेश सोलंकी यांनी महानगरीय जीवनातील जगण्याचा भयावह आणि विशाल पट आपल्या कवितेतून चित्रीत केला आहे. त्यांनी 'वर्जेश सोलंकीच्या कविता' आणि 'ततपप' या दोन कवितासंग्रहांचे लेखन केलेले आहे. या त्यांच्या दोन्हीही कवितासंग्रहांमधून महानगरातील गरीब आणि श्रीमंतांचे जगणे दारिद्र्य आणि श्रीमंती यात वाढत जाणारी दरी, गगनचुंबी इमारती आणि झोपडपट्टी त्याचबरोबर आधुनिक यंत्र आणि तंत्राच्या सहवासामुळे बदललेले माणसाचे स्वभाव या सर्वांचे चित्रण त्यांच्या कवितेतून आलेले दिसून येतात. ते आपल्या कवितेत असे म्हणतात की, "निघायची वेळ झाली तसे निघालो पकडली लोकल, चेंगरू दिलं गर्दीत, वाहू दिला घाम, बिन मेहनतीचा कपाळावरून काखेमधून मनगटावरून कुणाचा पाय, पायावर पडला तरी जिरवला संताप आतल्या आत"[६] अशा प्रकारची मुंबईसारख्या महानगरातील माणसाच्या जीवनातील घुसमट कवीने व्यक्त केली आहे.

वरील कवींशिवाय मन्या जोशी या कवीने मुंबईसारख्या महानगरीय जीवनात राहणाऱ्या माणसांच्या आयुष्यातील बकाल जगणे कसे आहे याचे वर्णन केलेले आहे तर सलील वाघ यांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि आयटी युगाचे परिणाम येथील माणसावर कसे झालेले आहेत. त्यामुळे माणसांच्या जीवनात कसे ताण तणाव निर्माण झालेले आहेत याचे वर्णन त्यांनी केलेले आहे.

जागतिकीकरणाच्या प्रभावातून मराठी ग्रामीण कवितेतही खूप मोठ्या प्रमाणात बदल झाले. गाव आणि खेड्यापर्यंत आधुनिकीकरण येऊन पोहोचले आणि त्यातूनच नवीन येणाऱ्या वस्तू विषयी खेड्यातील माणसाच्या मनामध्येही आकर्षण निर्माण झाले. खेडेगावातील जुना किराणा दुकानदार काळाच्या ओघात मागे पडत असून त्याची जागा खेड्यातील माणसे शहरात येऊन डी मार्टसारख्या नवीन संस्कृतीत रुजू लागलेले आहेत. शहरी संस्कृतीशी खेड्यातील माणसांचा संपर्क आल्यामुळे महानगरातील जगणे खेड्यातील लोकांना बरे वाटू लागलेले आहे आणि याच प्रभावातून खेड्यात आज मोठ्या प्रमाणात शहरीकरणाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. मराठी ग्रामीण कवितेत नव्याने बदल झालेल्या बदलाचे चित्रण करणारे अनेक कवी मराठीत आहेत त्यात श्रीकांत देशमुख, संतोष पवार, बालाजी मदन इंगळे, इंद्रजीत भालेराव, केशव देशमुख, कल्पना दुधाळ, महेंद्र कदम अशा कितीतरी कवींचे आपणास उदाहरण सांगता येतील. श्रीकांत देशमुख यांनी 'बळीवंत' 'आषाढ माती' आणि 'बोलावे ते आम्ही' या कवितासंग्रहांमधून जागतिकीकरणाचे वारे ग्रामीण भागापर्यंत कसे पोहोचले आहे. याचे चित्रण केलेले आहे. त्यांच्या कवितेत शेती व शेतकरी केंद्र असून त्याबरोबरच नव्या संस्कृतीच्या स्वीकारामुळे गाव आणि महानगरातल्या जगण्यावर नेमका काय परिणाम झाला याचा शोध श्रीकांत देशमुख यांनी आपल्या कवितेमधून घेतलेला दिसून येतो. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे शेतकऱ्याचे जगणे कसे मातीमोल होत आहे आणि या प्रभावामधून देशी संस्कृती कशी उद्ध्वस्त होत आहे. याचेही चित्रण त्यांच्या कवितेतून आलेले आहे. कवी संतोष पवार यांनी 'भ्रमिष्टांचा जाहीरनामा' हा कवितासंग्रह लिहून वर्तमान संस्कृतीतल्या आणि समाज जीवनातल्या जगण्यावर त्यांनी भाष्य केले आहे. बालाजी मदन इंगळे यांनी 'मेलं नाही अजून आभाळ' या कवितासंग्रहामधून जागतिकीकरणावर प्रखर प्रतिक्रिया दिलेली आहे ते असे म्हणतात की, "आत्महत्या केलेल्या बापाच्या चितेला अग्नी देऊन परत आल्यावर पोराने कोणत्या आशेने हाती नांगर धरावा"?[७] जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांचे आयुष्य कसे उद्ध्वस्त झालेले आहे आणि सांस्कृतिक मूल्य व्यवस्थेला कसा तडा गेलेला आहे याचे चित्रण बालाजी इंगळे यांच्या कवितेमधून आलेले आहे.

जागतिकीकरणाचा प्रभाव दलित कवितेवरही पडलेला आहे. १९९० नंतरच्या कालखंडातील अनेक कवींनी आपल्या कवितेमधून उपेक्षित पणाचे दुःख चित्रित केलेले आहे. त्यातील एक महत्त्वाचे कवी म्हणून अरुण काळे यांचा उल्लेख करता येईल. अरुण काळे यांच्या कवितेमध्ये जागतिकीकरणामुळे दलित व उपेक्षित यांची कशी उपेक्षा होत गेली. हे त्यांनी भेदक पद्धतीने मांडलेले आहे. त्यांच्या 'सायरनचे शहर' आणि 'नंतर आलेले लोक', 'ग्लोबलचं गावकुस' या कवितासंग्रहामधून बदललेल्या सभोवतालच्या परिस्थितीचे चित्रण आलेले आहे. आपल्या एका कवितेमध्ये ते असे म्हणतात की, आता तुझ्या झाडावरही उगवू लागल्यात केबलच्या छत्र्या, तू अजून पंख खाजवण्यात मशगुल पायातील वर्गीकरणाच्या तोड्यावर खुश."८ अशाप्रकारे वर्तमान काळातील सामाजिक भाष्य अरुण काळे यांनी आपल्या कवितेतून मांडलेले आहे. अरुण काळे यांच्याबरोबरच महेंद्र भवरे यांनी 'महासत्तेचे पीडादान' या कवितासंग्रहांमधून जागतिकीकरणाच्या प्रभावामधून कसे बदल झाले आणि त्यात नवीन प्रतिमा कश्या आल्या याचे चित्रण आपल्या कवितेमधून केलेले आहे ते एका कवितेमध्ये असे म्हणतात की, "हायवेवरचे हिजडे पाहून, परिचित अपरिचित असल्या नसल्या गावाचे, आठवतात चेहरे आणि मीही हसतो फकाफका"९ अशाप्रकारे महानगराच्या मोठ्या रस्त्यावर असणाऱ्या तृतीय पंथीयांचे उदाहरण देऊन माणसाचे आयुष्यातील निरर्थक आणि वैफल्यग्रस्त भावनेचे चित्रण त्यांनी आपल्या कवितेमधून केलेले दिसून येते. वरील कवींशिवाय प्रज्ञा पवार यांनीही दलित स्त्रियांच्या अस्तित्वाविषयी आणि भावावस्था विषयी आपल्या कवितेतून मांडणी केलेली आहे. आधुनिक काळात वायफाय आणि लॅपटॉपच्या जगात माणसं स्वतःचे जीवन कसे हरवत चाललेले आहेत याचेही चित्रण अनेक कवींच्या कवितेमधून आलेले आहे.

जागतिकीकरणाचा प्रभाव मराठी कवितेतील स्त्रियांच्या कवितेवरही फार मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. आधुनिक काळात स्त्री मोठ्या प्रमाणात नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने बाहेर पडत आहे. अनेक आयटी सारख्या कंपन्यांमध्ये तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे स्त्रियांना कामाची संधी मिळालेली आहे. नवीन बाजारपेठा, नवीन भांडवलदार, नवीन इलेक्ट्रॉनिक माध्यमे, इंटरनेटचे महाजाल या सर्व भांडवली क्षेत्रात स्त्रियांना कामाच्या मोठ्या संधी मिळत आहेत. त्यामुळे अनेकवेळा त्यांच्यावर अन्याय, अत्याचाराचे आणि शोषणाचे प्रसंग निर्माण झालेले पहावयास मिळतात याचे चित्रण मराठी कवितेतून आलेले दिसून येते. नोकरी आणि घर सांभाळणे यात स्त्रीची मोठी कसरत झालेली आहे. त्यामुळे अनेक वेळा स्त्रियांच्या आयुष्यात कौटुंबिक कलह आणि पुरुषप्रधान संस्कृतीच्या दडपणामुळे मानसिक कुचंबणा झालेली दिसून येते. या सर्व समस्यांचे चित्रण कवयित्रींनी आपल्या कवितेतून केलेले आहे. शिक्षणाने आलेले भान आणि आत्मभानाकडून आत्मसन्मानाकडे तिची झालेली वाटचाल स्त्रियांनी आपल्या कवितेमधून मांडलेली दिसून येते. त्यात मल्लिका अमर शेख, प्रज्ञा पवार, कविता महाजन, अश्विनी धोंगडे, कल्पना दुधाळ, कविता मुरूमकर अशा अनेक कवयित्रींचा समावेश करता येईल.

जागतिकीकरणाच्या आधुनिक युगात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी कवितेबरोबरच मुस्लिम कवितेवरही जागतिकीकरणाचा प्रभाव झालेला दिसून येतो. मुस्लिम कवींनी आपल्या कवितेमधून मुस्लिम व्यक्तीकडे संशयाने कसे पाहिले जाते त्याची खंत अनेक कवितांमधून व्यक्त केलेली दिसून येते. दहशतवादी संघटनांचे वाढते पेव आणि या संघटनांशी काहीतरी संबंध असेल या संशयाची पार्श्वभूमी म्हणून मुस्लिम व्यक्तीकडे कसे पाहिले जाते. हे मुस्लिम वास्तव आणि त्यांच्या मनात असणारी असुरक्षिततेच्या भावनांचे प्रकटीकरण अनेक मुस्लिम कवींनी आपल्या कवितेमधून केलेले दिसून येते. अजीम नवाज राही यांनी 'व्यवहाराचा काळा घोडा' आणि 'कल्लोळातला एकांत' या दोन कवितासंग्रहांमधून तंत्रज्ञानाच्या प्रभावातून आधुनिक युगात मुस्लिमांची नेमकी काय अवस्था होत आहे. त्याचे चित्रण केलेले आहे. याशिवाय डी. के. शेख यांच्या कवितेमधून मानुष्यता या मूल्याचा विचार आलेला आहे. त्यांचा 'दंगल आणि इतर कविता' हा संग्रह प्रसिद्ध असून हिंदू मुस्लिमांमधल्या जातीय द्वेषामुळे घडलेल्या आणि घडत असलेल्या घटनांचे वर्णन आलेले आहे.

जागतिकीकरणाच्या प्रभावापासून आदिवासी कविताही वेगळी राहिलेली दिसत नाही. आदिवासी बांधवांच्या जगण्यावर जागतिकीकरणाचा खूप मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. जागतिकीकरणाच्या प्रभावातून उदयास आलेल्या नवनवीन कंपनी त्या कंपनीसाठी लागणारी जागा या

जागेमुळे होणारी वृक्षतोड आणि विशेषतः दुर्गम भागामध्ये होत असलेले कंपन्यांचे विस्थापितीकरण यामुळे आदिवासी बांधवांवर खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो आणि त्यातून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असलेले दिसून येते. जागतिकीकरणाच्या दृश्य अदृश्य परिणामांची मांडणी कवी भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे या कवींनी केलेली दिसून येते. भुजंग मेश्राम यांनी शेती आणि वनसंस्कृतीच्या विघटनाचे दुःख आपल्या कवितेमधून मांडलेले दिसून येते. शेती होती आता पावेतो खानदानी बुड्डी, नव्हती त्यावेळी कीटकनाशक, ना रासायनिक नत्रांची खतं, नव्हते फवारे इड्रिंकचे ठिबक संच"[१०]

अशाप्रकारे भुजंग मेश्राम यांनी आपल्या कवितेमधून जागतिकीकरणाच्या प्रभावामधून शेतीमध्ये कसे आधुनिकीकरण आले आणि त्याचा परिणाम आदिवासी बांधवांच्या शेतीवरती कसा झाला. याचे दुःख आपल्या कवितेतून मांडलेले दिसून येते. भुजंग मेश्राम यांच्या बरोबरच कवी विनोद कुमरे यांनीही कविता लेखन केलेले दिसून येते. त्यांनी आपल्या कवितेमधून आदिवासी बांधवांचे विस्थापित होणे किंवा निसर्गापासून विभक्त होणे अशा स्वाभाविक क्रिया जागतिकीकरणात कशा घडत आहेत आणि ते होऊ नये म्हणून आदिवासी बांधव कसा धडपडत आहे याचे चित्रण आपल्या कवितेमधून केलेले आहे.

**निष्कर्ष -**

१. जागतिकीकरणानंतर आलेल्या कवितेमध्ये ताण-तणाव, बदलती संस्कृती, माहिती तंत्रज्ञान, संगणक या सर्व नवीन बाबींचा उल्लेख आलेला आहे.
२. नव जाणिवा आणि नव प्रतिमांचा वापर झालेला दिसून येतो.
३. पारंपरिक कवितेला नाकारून नवे शब्द, नवीन प्रतिमा यांचा वापर केलेला दिसून येतो.
४. भांडवलशाही धोरणामुळे सामान्य माणसाचे जीवन कसे उद्ध्वस्त झाले याचे चित्रण कवितेत आलेले दिसून येते.
५. श्रीमंत आणि भांडवलदार या वर्गाची चंगळवादीवृत्ती, स्वार्थ कवितेतून आलेला दिसून येतो.
६. जागतिकीकरणानंतरची कविता ही विश्वात्मक जाणीव व्यक्त करणारी कविता आहे.

**संदर्भ ग्रंथसूची -**

१. कांबळे उत्तम - 'जागतिकीकरणात माझी कविता' परचुरे प्रकाशन, मुंबई २००९ पृ. क्र. ११४
२. पी. विठ्ठल - 'मराठी कविता समकालीन परिदृश', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. ३१ मार्च २०१९, पृ. क्र. १८
३. तत्रैव - पृ. क्र. २५
४. संपादक साबू, नागरे, काकडे - 'मराठी साहित्यातील नवजाणिवा' शोधनिबंध विशेषांक, फेब्रुवारी २०२२ पृ. क्र. १०७
५. तत्रैव - पृ. क्र. १०४
६. पी. विठ्ठल - 'मराठी कविता समकालीन परिदृश्य', कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद, प्र. आ. ३१ मार्च २०१९ पृ. क्र. २७, २८
७. तत्रैव - पृ. क्र. ३३
८. तत्रैव - पृ. क्र. २८
९. तत्रैव - पृ. क्र. २७
१०. तत्रैव - पृ. क्र. ३८